**वस्तू व सेवाकर विभाग**
**विशेष राज्यकर आयुक्तांचे कार्यालय,**
**एच-विंग, ३ रा मजला, वस्तू व सेवा कर भवन, माझगांव,**
**मुंबई - ४०० ०१०.**

---

क्रमांक: रा.उपा./आस्था-४/शा.नि. ०२.०२.२०२४/२००५ जुनी निवृत्ती वेतन/२०२५/ब - 704 मुंबई, दिनांक - 05 DEC 2025

विषय :- दिनांक ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यकर निरीक्षक यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ लागू करणेबाबत.

संदर्भ: - १. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२३ / प्र.क्र.४६ / सेवा-४ दि.०२.०२.२०२४.
२. वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०२३ / प्र.क्र.१८ / सेवा-४ दि.०२.०५.२०२४.
३. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग शासन परिपत्रक रानिप्र.-२०२४/प्र.क्र.३५/सेवा-४ दि.३०.०५.२०२४.
४. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपअ-२०२४/प्र.क्र.५५/आस्था-४ दि.०१.१०.२०२४.
५. सहायक राज्यकर आयुक्त (आस्था-५), म.रा.,मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ब-१०६ मुंबई, दिनांक १४.०२.२०२५.
६. राज्यकर उपायुक्त, अपर राज्यकर आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ब-१८७ नागपूर, दिनांक १२.०२.२०२५.
७. सहायक राज्यकर आयुक्त (आस्था-६), म.रा.,मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांक ब-२६१ मुंबई, दिनांक २१.०२.२०२५.

**ज्ञापन:-**

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये दि.०१.११.२००५ पूर्वी पदभरती / जाहीरात / अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि.०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजु झालेल्या शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ , महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय देण्यात आला आहे.

त्यानुसार, संदर्भाधिन शासन निर्णयातील तरतूदीनुसार संबंधित कर्मचाऱ्यांची दिनांक ०१.११.२००५ रोजीच्या अगोदर प्रसिध्द करण्यात आलेल्या पदभरती / जाहीरात / अधिसूचनेच्या अनुषंगाने सरळसेवेने नियुक्त राज्यकर निरीक्षक, इतर विभागातून कार्यमुक्त होऊन वस्तू व सेवाकर विभागात राज्यकर निरीक्षक पदावर रुजू झालेले अथवा गट क/ड पदावर रुजू होऊन सध्या पदोन्नतीने राज्यकर निरीक्षक असणारे, त्याचप्रमाणे वस्तू व सेवाकर विभागात गट क/ गट ड पदावर रुजू होऊन सध्या पदोन्नतीने राज्यकर निरीक्षक पदी असणारे अशा खालील राज्यकर निरीक्षकांनी केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ , महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतूदी लागू करण्याबाबत विनंती केली आहे.

| अ. क्र. | राज्यकर निरीक्षकांचे नाव | एक वेळ पर्याय दिनांक | प्रथम नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. मकरंद मारुती खामणकर | ११.०३.२०२४ | २८.०१.२००९ |
| २. | श्री. रविंद्र सुदामराव मिसाळ (तत्कालीन राज्यकर निरीक्षक) | २६.०३.२०२४ | १२.०१.२००९ |
| ३. | श्री. धनाजी पोपटराव मसुगडे | ०६.०५.२०२४ | १०.०२.२००९ |
| ४. | श्रीम. तरल आनंदराव तांबे | २०.०२.२०२४ | ०१.०१.२००९ |
| ५. | श्री. राहूल रामचंद्र पितांबरे | १३.०३.२०२४ | ११.११.२००५ |
| ६. | श्री. विजयकुमार देवराव पुंडे (तत्कालीन राज्यकर निरीक्षक) | ०६.०५.२०२४ | २४.१२.२००५ |
| ७. | श्री. हेमंत नवनाथ केकान (तत्कालीन राज्यकर निरीक्षक) | ०६.०५.२०२४ | १६.१२.२००५ |
| ८. | श्री. दत्तात्रय बाबुराव व्हटकर | १३.०३.२०२४ | ३०.०६.२००६ |
| ९. | श्री. योगेंद्र प्रल्हाद आठवले | १५.०३.२०२४ | ०१.१२.२००५ |
| १०. | श्रीम. प्रिती प्रकाश दाभाडे | ११.०७.२०२४ | ०१.०९.२००८ |
| ११. | श्री. विलास देविदास देशमुख | ०६.०५.२०२४ | २१.०६.२००६ |
| १२. | श्री. शरद शिवाजी बोरसे | ०१.०४.२०२४ | १२.०२.२००७ |
| १३. | श्री. मुक्तेश्वर पुरुषोत्तम कुलकर्णी | ०३.०४.२०२४ | ३०.१२.२००५ |
| १४. | श्रीम. ज्योती रविंद्र सातोकर | १४.०६.२०२४ | ३०.१२.२००५ |

उक्त तक्त्यातील राज्यकर निरीक्षकांनी जुनी निवृत्तीवेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय विहित मुदतील सादर केला आहे. यास्तव, शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ०२.०२.२०२४ मधील तरतूदीनुसार उक्त तक्त्यातील राज्यकर निरीक्षकांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ ; महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतूदी लागू करण्यात येत आहे.

उक्त नमूद राज्यकर निरीक्षकांना शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ०२.०२.२०२४ मधील तरतुदीनुसार, जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्यात येत असल्यामुळे त्यांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील खाते आहरण व संवितरण अधिकारी यांनी तात्काळ बंद करावे.

उक्त तक्त्यातील राज्यकर निरीक्षकांचे भविष्य निर्वाह निधीचे (GPF) खाते उघडण्यात यावे व सदर खात्यात शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक ०२.०५.२०२४ मध्ये दिलेल्या कार्यपध्दतीनुसार राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी. तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्यात यावी.

5/12/25

**नितीन पाटील**
**(भा.प्र.से.)**
**विशेष राज्यकर आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत:-

१. मा. राज्यकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संबंधित अपर राज्यकर आयुक्त कार्यालय
३. राज्यकर सहआयुक्त (मुख्यालय-०४), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. संबंधित राज्यकर सहआयुक्त.
५. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) व (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / नागपूर.
६. संबंधित अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. संबंधित राज्यकर निरीक्षक